**आजचा शुभ विचार**

“"बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-25 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuesday 27 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २५ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. २७ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## दापोली-खेड रस्ता बंद! जगबुडी नदी धोक्याच्या पातळीवर; रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात मुसळधार पावसाचा इशारा

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पावसाचा जोर कायम असून, त्याचा परिणाम दापोली-खेड प्रमुख राज्य मार्गावर दिसून आला आहे. खेड तालुक्यातील फुरुस गावाजवळ पुलाचे काम सुरू असून, यासाठी तयार करण्यात आलेला पर्यायी मार्ग पावसामुळे चिखलमय झाला आहे. परिणामी या मार्गावरील वाहतूक तातडीने बंद करण्यात आली आहे. आता ही वाहतूक दस्तुरीवरून पालगडमार्गे वळवण्यात आली आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यात सोमवारी सकाळी ८ वाजेपर्यंत एकूण २२४९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामध्ये मुरुड तालुका ३७१ मिमी, श्रीवर्धन ३०७ मिमी, तर सर्वात कमी पेण तालुका ५० मिमी पावसासह सरासरी १४०.५६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातही एकूण ९९७.९३ मिमी पाऊस पडला असून, सरासरी ११०.८८ मिमी इतकी नोंद झाली आहे. यामध्ये मंडणगड (२११.२५ मिमी) सर्वाधिक आघाडीवर आहे, तर राजापूर (५९.२५ मिमी) सर्वात कमी पावसाची नोंद आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४६६ मिमी एकूण पाऊस पडला असून, सरासरी ५८.२५ मिमी इतकी नोंद झाली आहे. कुडाळ, कणकवली आणि वैभववाडी या तालुक्यांत ६० मिमीपेक्षा अधिक पाऊस पडला आहे.

### जगबुडी नदी धोक्याच्या पातळीवर

जगबुडी नदीवरील भराणे नाका पुलाजवळ सकाळी १० वाजेच्या सुमारास पाण्याची पातळी ५ मीटरवर पोहोचली असून, तीच अलर्ट पातळी असल्याने धोका पातळीच्या अगदी जवळ पाणी पोहोचले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील ३ ते ४ तासांमध्ये कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. यावेळी ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पावसाचा फटका रेल्वे वाहतूक कोलमडली, रस्ते वाहतूक मंदावली, अंधेरी सब वे बंद

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



मे महिन्यात आलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईला फटका बसला. एरवी घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या मुंबईकरांच्या आठवड्याची सुरुवात संथ गतीने झाली. सखल भागात पाणी साचले आहे. अंधेरी सब वे पाणी साचल्यामुळे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर सखल भागांमध्ये पाणी साचल्यामुळे रुळ गायब झाले. रुळ पाण्याखाली गेल्यामुळे मध्य रेल्वेची वाहतूक ठप्प झाली. पश्चिम रेल्वेच्या गाड्या दहा ते वीस मिनिटे उशिराने धावत आहेत. ऑफिसला जात असलेले अनेकजण पावसामुळे ठिकठिकाणी अडकले आहेत. मिळेल त्या वाहनाने पुढे प्रवास करुन जात आहेत. मध्य रेल्वेच्या मशिद बंदर तसेच चुनाभट्टी आणि सायन या स्थानकांवर पाणी साचल्यामुळे रेल्वे वाहतूक पुरती कोलमडली आहे. केईएम रुग्णालयाच्या आवारातही पाणी साचले आहे. गांधी मार्केट, सायन रोड क्रमांक २४, वडाळा उड्डाणपुलाखालील भाग, हिंदमाता येथे पाणी साचल्यामुळे रस्ते वाहतूक मंदावली आहे. भरती आली असल्यामुळे उंचच उंच लाटा येत आहेत. नागरिकांना समुद्रकिनारी जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

## पुढील तीन दिवस पावसाचे, नंतर 'एवढे' दिवस नसेल पाऊस

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



महाराष्ट्रात ऐन मे महिन्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. सोमवार सकाळपासूनच संपूर्ण कोकण किनारपट्टीवर मुसळधार पाऊस पडत आहे. मध्य महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मान्सूनने महाराष्ट्रातील काही भाग व्यापला आहे. मुंबईसह पुणे आणि सोलापुरातही नैऋत्य मोसमी पावसाला सुरुवात झाली आहे. पुढील तीन दिवस महाराष्ट्रात पावसाची शक्यता आहे असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. आठवड्याची सुरुवात दमदार पावसाने झाली आहे. आज म्हणजेच सोमवार २६ मे २०२५ रोजी मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे सातारा या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे सातारा या जिल्ह्यांना रेड अलर्ट दिला आहे. पुणे, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, बीड ,लातूर, धाराशिव या जिल्ह्यांना हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. मान्सून केरळमध्ये पोहोचला आणि महाराष्ट्रातही मुसळधार पाऊस सुरू झाला. संपूर्ण कोकण किनारपट्टीच्या भागात दोन दिवसांपासून पावसाने दमदार हजेरी लावली आहे. पावसामुळे शहरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पण ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण आहे. शेतीच्या कामांचे वेळापत्रक पुरते बिघडले आहे.

### हवामान विभागाचा धक्कादायक अंदाज

आता सलग तीन दिवस पावसाची शक्यता असली तरी मे महिन्याच्या अगदी शेवटच्या दिवसांमध्ये पाऊस पडणार नाही. ही स्थिती २८ किंवा २९ मे पासून निर्माण होईल. हीच स्थिती पाच जूनपर्यंत कायम राहणार आहे. यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

## मोसमी पावसाचे आगमन, पण पेरणी कराल तर नुकसान

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



यावर्षी मोसमी पावसाचा प्रवास वेगाने सुरु असल्यामुळे तो २५ मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे, जे सामान्य तारखेपेक्षा दहा दिवस आधीच आहे. मात्र, २७ मे पासून मोसमी पावसाच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील.

### सध्याचा अंदाज काय ?

सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळू हळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे आणि किमान पाच जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान पाच जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मोसमी पावसाच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान भागात दमदार मोसमी देशातील इतर भागात सुद्धा पावसापूर्वीचा वादळी पाऊस

> **हवामान शास्त्रज्ञांचे म्हणणे काय ?**
>
> मोसम पावसाचे आगमन वेळेच्या आधीच झाल्याची घोषणा झाली असली तरी संपूर्ण राज्य व्यापण्यास अजून बराच वेळ बाकी आहे. कारण २७ मे पासून मोसमी पावसाच्या प्रवासाची गती कमी होणार आहे. राज्याच्या बहुतांशी भागात मोसमी पाऊस दाखल होण्यास अजून बराच कालावधी बाकी आहे. साधारणपणे पाच जूनपर्यंत तरी मोसमी पाऊस संपूर्ण राज्य व्यापण्याची शक्यता कमीच आहे. सध्या मोसमी पाऊस आता राज्य लवकरच व्यापणार असे सांगितले जात आहे, पण शेतकऱ्यांनी यावर विश्वास ठेवून लगेच पेरणीची घाई करू नये. नाही तर नेहमीप्रमाणे नुकसान होण्याची शक्यताच अधिक आहे.
>
> **डॉ. अक्षय देवरस**
>
> **संशोधन शास्त्रज्ञ, नॅशनल सेंटर फॉर ॲटमॉस्फेरिक सायन्स अँड डिपार्टमेंट ऑफ मेट्रिओऑलॉजी, रीडिंग युनिव्हर्सिटी, लंडन**

मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो.

### शेतकऱ्यांसाठी इशारा काय ?

या वर्षी राज्यातील अनेक पडला आहे. आपल्या भागात मोसमी पाऊस लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### मुसळधार पाऊस कुठे ?

दरम्यान दक्षिण कोकण आणि गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने गेल्या तीन ते चार दिवसांपासून या भागांत प्रचंड पाऊस सुरु आहे. येत्या ३६ तासांत राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अनेक भागात पावसामुळे नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. काही भागात पावसामुळे जनजीवन देखील विस्कळीत झाले आहे. दरम्यान, एका बाजूला पाऊस पडत असताना दुसऱ्या बाजूला काही भागात शेती पिकांना देखील फटका बसत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## मुंबईत पावसाने मोडला 107 वर्षांचा विक्रम

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



महाराष्ट्रातील मुंबईत मुसळधार पाऊस सुरू असताना, सोमवारी शहरात मान्सूनच्या पहिल्याच दिवशी १०७ वर्षांतील सर्वाधिक पाऊस नोंदवला गेला आहे. भारतीय हवामान खात्यानुसार, मुंबईत झालेल्या पावसासह, मान्सून नेहमीपेक्षा १६ दिवस आधी शहरात दाखल झाला.

नैऋत्य मान्सून आज, २६ मे २०२५ रोजी मुंबईत दाखल झाला आहे, मान्सून नेहमीपेक्षा १६ दिवस आधी मुंबईत दाखल झाला आहे. २००१-२०२५ या कालावधीत मुंबईत दाखल झालेला हा सर्वात जास्त पावसाचा विक्रम आहे, असे आयएमडीने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे. मुसळधार पाऊस आणि पाणी साचण्याच्या समस्यांव्यतिरिक्त, मुंबईतील पावसाने १९१८ मध्ये नोंदवलेला विक्रम मोडला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) नोंदी दर्शवितात की सोमवारी मध्यरात्री ते सकाळी ११ वाजेपर्यंत दक्षिण मुंबईच्या अनेक भागात २०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडला आहे. शिवाय, कुलाबा वेधशाळेने, मुंबईत सर्वाधिक २९५ मिमी पाऊस नोंदवला आहे. यापूर्वीचा विक्रम मे १९१८ मध्ये २७९.४ मिमी पर्यंत पावसासह तयार करण्यात आला होता. आयएमडीच्या आकडेवारीनुसार सोमवारी सकाळी ८:३० ते ११ वाजेपर्यंत कुलाबा येथे १०५.२ मिलीमीटर, सांताक्रूझ (५५ मिमी), वांद्रे (६८.५ मिमी), जुहू विमानतळ (६३.५ मिमी), चेंबूर (३८.५ मिमी), विक्रोळी (३७.५ मिमी), महालक्ष्मी (३३.५ मिमी) आणि सायन (५३.५ मिमी) येथे पाऊस पडला.

मे महिन्यात होणारा पाऊस हा ७५ वर्षांतील मुंबईतला सर्वात पहिला मान्सून आहे. आयएमडीच्या आकडेवारीनुसार, मुंबईत मान्सून हंगाम सुरू होण्याची सरासरी तारीख ११ जून आहे. २०२४ मध्ये, नैऋत्य मान्सून ६ जून रोजी सुरू झाला होता. नैऋत्य मान्सून २६ मे रोजी मुंबईत दाखल झाला. गेल्या ७५ वर्षांतील ही सर्वात पहिली सुरुवात आहे, असे भारतीय हवामान खात्याच्या (आयएमडी) शास्त्रज्ञ सुषमा नायर यांनी सांगितले आहे. या प्रदेशांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आल्यानंतर, हवामान विभागाने अधिकृतपणे नैऋत्य मान्सूनची सुरुवात नेहमीपेक्षा १६ दिवस आधीच झाल्याचे जाहीर केले आहे. सोमवारी, आयएमडीने मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज' अलर्टमध्ये सुधारणा केली आहे आणि मुंबईला इशारा दिला आहे. तसेच कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडूच्या काही भागांसाठी अलर्ट जारी केले आहेत. नैऋत्य मान्सून मध्य अरबी समुद्राच्या काही भागात, मुंबईसह महाराष्ट्राच्या काही भागात, कर्नाटकसह बंगळुरू, तामिळनाडूचा उर्वरित भाग, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशचा काही भाग, पश्चिम मध्य आणि उत्तर बंगालच्या उपसागराचा काही भाग, मिझोरामचा उर्वरित भाग, संपूर्ण त्रिपुरा, मणिपूर, नागालँड, अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयाचा काही भाग, २६ मे रोजी पुढे सरकला आहे, असे आयएमडीने म्हटले आहे.

## करोनाने पुन्हा काढलं डोकं वर, महाराष्ट्रात आत्तापर्यंत 4 रुग्णांचा मृत्यू

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



भारतात पुन्हा एकदा करोनाने डोकं वर काढल्याचं चित्र दिसून येतं आहे. सध्याच्या घडीला करोनाचे NB.1.8.1 आणि LF.7 हे दोन व्हेरिएंट दिसून येत आहेत. WHO ने याबाबत माहिती दिली आहे. २६ मे रोजी आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या पत्रकानुसार सुमारे १ हजाराहून जास्त सक्रिय रुग्ण देशभरात आहेत. करोनाच्या दोन लाटा येऊन गेल्या आहेत. आता पुन्हा एकदा करोना

### केरळमध्ये करोनाचे सर्वाधिक रुग्ण

केंद्रीय आरोग्य विभागाच्या माहितीनुसार केरळमध्ये करोनाचे सर्वाधिक रुग्ण आहेत. भारतात सध्या १००९ रुग्ण करोनाशी लढा देत आहेत. त्यापैकी ४३० रुग्ण हे एकट्या केरळमध्ये आहेत. करोनाचा केरळला सर्वाधिक फटका बसल्याचं सध्याच्या आकडेवारीनुसार तरी दिसून येतं आहे. करोना झालेल्या रुग्णांना गृह विलिगीकरणात ठेवण्यात आलं आहे अशी माहिती केरळ प्रशासनाने दिली आहे. तर केरळमध्ये आत्तापर्यंत करोनामुळे दोन रुग्णांचा मृत्यू झाल्याचंही वृत्त आहे.

### महाराष्ट्रात २०० हून अधिक रुग्ण आणि चार मृत्यू

केरळनंतर महाराष्ट्रात करोनाचे २०९ सक्रिय रुग्ण आहेत. तर आत्तापर्यंत चार रुग्णांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. एकट्या मुंबईत करोनाचे ३५ रुग्ण आहेत. त्यामुळे आज आलेल्या अहवालानंतर महारष्ट्रात २४० करोना रुग्णांची नोंद झाली आहे. जे चार मृत्यू राज्यात झाले आहेत त्यांना आधी मधुमेह, उच्च रक्तदाब या व्याधी होत्या असं आरोग्य विभागाने स्पष्ट केलं आहे.दरम्यान हैदराबाद आणि बंगळुरु या शहरांमध्येही करोनाचा प्रादुर्भाव वाढतो आहे.

### दिल्लीत करोनाचे १०४ रुग्ण

महाराष्ट्रानंतर दिल्लीत करोनाचा प्रादुर्भाव वाढताना दिसतो आहे. १०४ जणांना करोना झाला आहे. सध्या या रुग्णांवर गृह विलीगीकरणातच उपचार सुरु आहेत. कर्नाटक, तेलंगणा, गुजरात, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्येही करोनाचे रुग्ण आढळले आहेत. मात्र त्यांचं प्रमाण केरळ, महाराष्ट्र आणि दिल्लीच्या तुलनेत कमी आहे.

संपादकीय

# समितीच्या दौऱ्यात रोकड कुठून आणि कशासाठी?

निश्चलीकरणानंतर दहशतवाद आणि काळा पैसा या दोन्हींना चांगला आळा बसला, असा दावा सत्ताधारी भाजपकडून नेहमी केला जातो. पण नुकत्याच घडलेल्या दोन घटनांवरून हा दावा कसा फोल ठरतो हेच अनुभवाला येते. यातील पहिली घटना पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि दुसरी, आमदारांच्या धुळे दौऱ्यात सापडलेली १ कोटी ८४ लाख रुपयांची रोख रक्कम. विधिमंडळातील २९ विविध समित्यांचे गेल्याच सोमवारी औपचारिक उद्घाटन झाले. 'समित्यांची बदनामी होणार नाही याची खबरदारी घ्या, कारण यापूर्वीचा समित्यांचा अनुभव फार काही चांगला नाही', अशी कटू भावना फडणवीस यांनी व्यक्त केली होती. हे शब्द हवेत विरण्यापूर्वीच अंदाज समितीच्या धुळे-नंदुरबार दौऱ्यात रोख रक्कम आढळण्याच्या प्रकारातून विधिमंडळाची लक्तरेच वेशीवर टांगली गेली. शिवसेना शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली अंदाज समितीचे सदस्य असलेले १० ते १२ आमदार धुळे दौऱ्यावर गेले होते. त्याच वेळी धुळ्याच्या शासकीय विश्रामगृहात वेगळेच नाट्य घडले. माजी आमदार अनिल गोटे यांनी 'विश्रामगृहातील कक्षात रोख रक्कम आहे' असा आरोप करीत ठिय्या मांडला. शेवटी सरकारी यंत्रणांचा नाइलाज झाला. कक्ष फोडून आत तपासणी करण्यात आली असता १ कोटी ८४ लाख रुपयांची रोख रक्कम आढळली. ती मोजण्यासाठी तीन यंत्रे मागवावी लागली. धुळे जिल्ह्यातील ठेकेदारकांकडून ही रोख रक्कम जमा करण्यात आल्याचा आरोप गोटे यांनी केला. तेलगी घोटाळ्यात 'मोक्का' अंतर्गत तुरुंगवास भोगलेल्या गोटे यांचा पूर्वेतिहास फारसा उज्वल नाही. त्यामुळे समितीला बदनाम करण्यासाठी ही रोख रक्कम आणण्यात आली वगैरे युक्तिवाद आमदारांकडून सुरू झाले. पण आमदारांच्या दौऱ्याच्याच वेळी नेमकी एवढी रोख रक्कम कशी आढळली? दोनच महिन्यांपूर्वी अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'लक्षवेधी सूचना मांडण्यासाठी पैसे घेतले जातात,' 'अध्यक्षांच्या दालनात काही आमदार लक्षवेधीसाठी पैशांची चर्चा करीत होते', असा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे गटनेते भास्कर जाधव यांनी विधानसभेत केला होता. नेहमीप्रमाणे या आरोपांचा इन्कार करण्यात आला. पण आमदारांच्या दौऱ्यावेळी रोकड सापडल्याने 'मग पैसे कशासाठी?' ही चर्चा सुरू होणे साहजिक. 'समित्यांचा पूर्वीचा अनुभव चांगला नाही' हे फडणवीस यांनी आठवड्यापूर्वी केलेले विधानही तेवढेच बोलके. विधानसभेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेण्याचे प्रकरण काही वर्षांपूर्वीदेखील गाजले होते. पण हे प्रकरण उघडकीस आणणारा पत्रकार अक्षरशः आयुष्यातून उठला. नंतर त्याला हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. याउलट आमदारांना विशेषाधिकाराचे संरक्षण. आमदारांच्या वर्तनाविरोधात काहीही लिखाण केल्यास हक्कभंगाचे आयुध आमदारांसाठी उपलब्ध. खरे, खोटे न बघता लिखाण करणाऱ्याला थेट तुरुंगात धाडण्यात आल्याची अनेक उदाहरणे आहेत. विधिमंडळात संसदीय आयुधांचा वापर करण्यासाठी पैसे घेतले जातात किंवा आमदारांच्या दौऱ्यांच्या वेळी पैसे वाटले जातात, असे आरोप अनेकदा झाले. आतापर्यंत हे आरोपांच्याच पातळीवरच होते. कारण अशा आरोपांमध्ये पुरावे तरी काय सापडणार? कोणी पुरावे सादर करू शकले नव्हते. यामुळेच या आरोपांचा बागुलबुवा केला जातो, असे लोकप्रतिनिधींचे म्हणणे असते. धुळ्यात आमदारांच्या दौऱ्यात रोख रक्कम आढळल्याने हा फुगाही आता फुटला आहे. अंदाज समितीच्या दौऱ्यावेळी समिती प्रमुखांच्या सचिवांच्या दालनात ही रोख रक्कम आढळते हा मामला गंभीरच. एवढे पैसे विधिमंडळातील कक्ष अधिकाऱ्याच्या दालनात आले कसे? आमदारांचे दौरे नेहमीच वादग्रस्त ठरतात. काही ठिकाणी अधिकाऱ्यांकडून वेगवेगळ्या मागण्या आमदारांकडून दौऱ्याच्या वेळी केल्या गेल्याची उदाहरणे आहेत. तक्रारी वाढल्यानेच मागे आमदारांचे दौरेच थांबविण्यात आले होते. पण आमदारांच्या मागणीनंतर दौरे पुन्हा सुरू करण्यात आले. रोख रक्कम आढळल्यावर समिती प्रमुख आमदार खोतकर यांच्या स्वीय सचिवांना- किशोर पाटील यांना- निलंबित करण्यात आले. ते आधीच धुळ्यात कशासाठी गेले होते? त्यांची समितीच्या अध्यक्षांकडे अधिकृत नियुक्ती झालेली नसल्याचे विधानसभा अध्यक्षांनीच जाहीर केले. सारेच संशयास्पद. एक कोटी ८४ लाख रुपयांची रोख रक्कम त्यांच्या दालनात कशासाठी जमा झाली? हे पैसे तोंड गप्प करण्याकरिता आमदारांना वाटण्यासाठी आणण्यात आले होते का? पैसे सापडण्याचे प्रकरण गंभीर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर करून चौकशीची घोषणा केली हे ठीकच; पण कोणाला तरी बळीचा बकरा बनवून प्रकरण दडपले जाऊ नये आणि 'समितीच्या दौऱ्यात एवढी रोकड आली कुठून? कशासाठी?' याची उत्तरे मिळावीत, ही अपेक्षा आहे.

## २७ मे गडकरींच्या वाढदिवसानिमित्त

# आधुनिक युगातील "विकासपुरूष" नितीनजी गडकरी

आजच्या आधुनिक युगात देशात जे काही रस्त्यांचे जाळे व उड्डाणपूल दिसत आहे त्याचे संपूर्ण श्रेय केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनाच जाते.कारण रस्त्यामुळेच दळणवळणाचा मार्ग मोकळा होतो व विकासाची दिशा ठरत असते.नितीनजी गडकरी यांच्या बुध्दीमत्तेचा व दुरदृष्टीतेचा वापर अनेक देश करीत आहे.त्यामुळे विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने व आदरतीथ्याने भारतासह संपूर्ण जगात घेतले जाते.आज जगात गडकरींचे नाव विकासपुरूष म्हणून मोठ्या आदराने आणि स्वाभिमानाने घेतले जाते.औद्योगिक आणि तांत्रिकदृष्टया सर्वगुन संपन्न असलेले बलाढ्य देश अमेरिका, चीन, रशिया, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया यांना मागे टाकून महामार्गाच्या बाबतीत अव्वल स्थान मिळविने भारतासारख्या लोकशाही देशाकरीता अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी आपले लक्ष पुर्ण करण्यासाठी संपूर्ण शक्तीनिशी महामार्गाच्या कामाकडे लक्ष केंद्रित केले.त्यामुळेच आज भारत महामार्गाच्या जाळयाच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे.कारण गडकरींना ग्यात होते की महामार्गाशिवाय देशाचा इतर बाबतीत सुद्धा विकास संभव नाही. त्यामुळे गडकरींनी जेव्हा राजकारणात पाऊल टाकले तेव्हा पाहूनच त्यांच्या मनात विकासाचे कालचक्र फिरत असावे.जनुकाय महाभारतातील संजयच म्हणावे लागेल. गडकरींनी विकासाची सुरूवात महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री असतांना पासून सुरू केली.यानंतर विकासाच्या बाबतीत मागे वळून कधीच पहाले नाही. २०१४ मध्ये नितीनजी गडकरी केंद्रीय मंत्री बनले तेव्हा पासून आजपर्यंत देशात हजारो किलोमीटरचे अत्याधुनिक पध्दतीने महामार्ग बनवून १४० कोटी जनतेला होणारा त्रास दुर झाला, त्याचबरोबर दळणवळण, आरोग्य सेवा, व्यापारी वाहतूकीला व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात चालना मिळाली सोबतच गावागावात रोड बनवून गावतीथे सिमेंट रोड हि संकल्पना साकार होतांना दिसत आहे.त्याच पध्दतीने ७०१ किलोमीटरचा नागपूर- मुंबई समृद्धी महामार्ग बनवून विकासाचा नवीन इतिहास घडविला. यामुळे हजारो लोकांना रोजगार सुध्दा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.देशातील नवीन महामार्गामुळे हजारो किलोमीटरची वाहातुक सर्वांसाठी सुलभ झाल्याचे दिसून येते. यामुळे अनेक बाजारपेठांशी ताबडतोब संपर्क साधता येतो. गडकरींची कला अवगत करण्यासाठी विदेशातील अनेक एक्स्पर्ट व तज्ञ त्यांच्याशी सल्ला-मसलत करतात.त्यामुळेच आज जगात विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने घेतले जाते.महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर महाराष्ट्राचा विकास सुवर्ण अक्षरांनी लिहावा या पध्दतीने गडकरींनी कार्य केल्याचे दिसून येते.आज नागपूरात आपल्याला मेट्रो धावतांना दिसत आहे.त्याचे संपूर्ण श्रेय माननीय गडकरींना जाते. मेट्रोमुळे लोकांपुढील वाहतुकीची कोंडी तुटली व मोठी सुविधा झाली. त्याचबरोबर अनेक बेरोजगारांना रोजगार देण्याचा मार्ग सुलभ केला.संपुर्ण महाराष्ट्रात उड्डानपुल व सिमेंट रोडमुळे महाराष्ट्राची संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.जी-२० च्या अनुषंगाने भारताचे केंद्रबिंदु असलेले नागपूर झगमगत होते यात गडकरींचा सिंहांचा वाटा आहे.यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रासह देशाला खरा विकासाचा मार्ग दाखविला असेल तर नितीनजी गडकरी यांनी त्यामुळेच त्यांना आज संपूर्ण देश सन्मानाने व आदराने सलाम करतो.राज्याच्या विकासासोबत देशाचा विकास सुरू असतांनाच राज्याची व देशाच्या संस्कृतीचे जतन करण्याची धुराही सांभाळण्याचे काम गडकरींनी केले. नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात २०१८ पासून झाली.त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरात खासदार महोत्सव साजरा केल्या जातो.यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.यात खास करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जाते.या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्मांची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते.यामुळे महाराष्ट्राचा वारसा दिसून येतो.नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे.पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने दरवर्षी आपल्याला खासदार महोत्सवात पहायला मिळतो आणि खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने खासदार क्रीडा महोत्सव दरवर्षी घेण्यात येतो.याचे संपूर्ण श्रेय गडकरींना जाते. सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे.परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते.आज गडकरींच्या पुंण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुले व महामार्ग पहायला मिळते. त्यामुळेच त्यांना उडानपुलाचे प्रनेते सुध्दा म्हणतात आणि आता भारताला महामार्गाच्या जाळयाच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकावर आणुन गडकरींनी नवीन इतिहास घडविला आहे.नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे.नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे.आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते.त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते.संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय.आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे.परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सांस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते.आजच्या पिढीला आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येते.खासदार महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल.त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.१९४७ नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे. कमी कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारताचा विकास रोडच्या व उड्डाणपूलाच्या माध्यमातून करून देशाला विकासाची नवीन दिशा दिली आहे आणि जगात महामार्गाचा डंका वाजवला.याचाच गाजावाजा आज आपल्याला जगात पहायला मिळतो.त्यामुळे गडकरी भारताचेच नाही तर जगाचे विकास पुरूष आहेत असे मी समजतो.खरोखरच महाराष्ट्राचा व देशाचा विकासाचा मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा पुत्र नागपूर भुमित जन्माला आला ही देशासाठी गौरवाची बाब आहे.ज्या दिवसापासुन खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर जगभरात प्रसिद्ध आहे ही नागपूरकरांसाठी व महाराष्ट्रासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जाणवु ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची व क्रीडा क्षेत्राची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते.यासाठी त्यांनी आपली संपूर्ण ताकद पुर्णपणाला लावली आहे.भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात.परंतु असामाजिक तत्वांनी नागपूरमध्ये १८ मार्च २०२५ ची औरंगजेब यांच्या समाधीवरून उसळलेली दंगल वगळता कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही.नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी, ताजबाग, गणेश टेकडी,चर्च इत्यादी अनेक धर्मांची पुरातन स्थळे आहेत.त्याचे जतन सर्वधर्मीय करतात.गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्माविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत.खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे.नागपुरला राजकीय दृष्ट्या संघभुमि म्हणून भारतासह जगभर ओळखले जाते.परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम-शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात.ही नागपूरसाठी व नागपूरकरांसाठी सन्मानाची बाब आहे. गडकरी नागपूरचे खासदार झाले म्हणूनच विकास झाला आणि त्यांच्यामुळेच संस्कृतीचे जतन कसे करावे याची शिकवण खासदार महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना मिळत असते.आज गडकरींच्या कामाची शैली व एकाग्रता लक्षात घेता ते भारतासाठी "विकासपुरुष"आहे.खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पुनर्जीवीत करण्याचे काम करीत आहे.खासदार महोत्सवामध्ये कला, संस्कृती, साहित्य यासोबतच मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे दर्शन सुध्दा होते.१९९७ मध्ये असाच सांस्कृतिक कार्यक्रम गडकरी यांनी स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने यशवंत स्टेडियम येथे आयोजित केला होता.त्यातही आपल्याला कला, साहित्य व सांस्कृतिची जडन-घडन दिसून आली.असे विकास पुरूष केंद्रीय मंत्री सन्माननीय नितीनजी गडकरी यांची विकासाची गती उच्च शिखरावर जावो आणि महाराष्ट्रासह भारताचा विकास आणखी गतीशील होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
नागपूर.

# मातोश्री प्रतिष्ठाण तर्फे शिरूर शहरात दिशादर्शक फलक लावण्याची मागणी

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



शहरात येणाऱ्या नागरिकांना व पर्यटकांना शासकीय कार्यालये, रुग्णालये, शाळा, बस स्थानके यासारखी महत्त्वाची ठिकाणे शोधण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मातोश्री प्रतिष्ठान तर्फे शिरुर शहरात दिशादर्शक फलक (साईन बोर्ड) लावण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी दिनांक १४ मे रोजी प्रतिष्ठानच्या वतीने शिरुर नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी राहुल पिसाळ यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात शहरातील प्रमुख चौक, रस्ते व सार्वजनिक ठिकाणी स्पष्ट व सुस्थितीत दिशादर्शक फलक लावण्याची विनंती करण्यात आली असून, त्यावर शासकीय कार्यालये, रुग्णालये, शाळा, महत्त्वाचे चौक व रस्त्यांची दिशानिर्देश माहिती असावी, अशी मागणी आहे. निवेदन देताना मातोश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभिजीत आंबेकर, हुडको कृती समितीचे संघटक शैलेश जाधव आणि सतीश केदारी उपस्थित होते. शहराच्या सौंदर्यीकरणासोबतच नागरिकांच्या सुविधेसाठी ही पायरी उपयुक्त ठरेल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# भारतीय बौद्ध महासभा मलकापूर तालुका अध्यक्षपदी जी.एन.इंगळे सर यांची निवड







भारतीय बौद्ध महासभा मलकापूर द्वारा दि.२५ मे रोजी आयोजित तालुका शाखा पुनर्गटन सभेत जी. एन. इंगळे सर यांची मलकापूर तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली स्थानीक कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह मलकापूर येथे आयोजित सभेचे अध्यक्षस्थानी माजी तालुकाध्यक्ष राजू शेगोकार तर प्रमुख अतिथी म्हणून भीमरावजी तायडे राज्य संघटक तर निवड समिती के.के.शेगोकार जिल्हाध्यक्ष, बी.एन सुरवाडे जिल्हा सरचिटणीस, धम्मपाल वाघ जि. कोषाध्यक्ष, एम.ओ.सरकटे जि.संघटक तथा मलकापूर प्रभारी, एस.एस.वले सर जि.संघटक, एम.एस.वाघ जि.संस्कार सचिव यांची उपस्थिती होती सभेचे प्रास्ताविक एम.ओ.सरकटे यांनी केले, याप्रसंगी एस.एस.वले सर यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रिय पुरस्कार कोलंबो श्रीलंका येथे बहाल झाल्याबद्दल तालुक्याच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला तद्नंतर जिल्हाध्यक्ष के.के.शेगोकार यांनी जुनी तालुका कार्यकारणी बरखास्त केल्याचे जाहीर केले तथा नवीन कार्यकारणीचे अर्ज स्वीकारून त्यांचे कार्य कर्तुत्व,भारतीय बौध्द महासभेला दीलेले योगदान, समर्पन, जनसंपर्क इत्यादीचा विचार करुन प्रत्यक्ष मुलाखत घेऊन निवड समितीने पुढील प्रमाणे कार्यकारणी घोषित केली त्यामध्ये तालुका अध्यक्ष जी.एन.इंगळे सर, ता.सरचिटणीस एस.बी.निकम सर, कोषाध्यक्ष दादाराव शामराव राणे, उपाध्यक्ष प्रचार व पर्यटन अनिल वासुदेव इंगळे, उपाध्यक्ष संरक्षण विभाग बाबुराव त्र्यंबक वानखेडे, हिशेब तपासनीस अर्जुन धनु इंगळे, कार्यालयीन सचिव संतोष दामोदर बागडे, संस्कार सचिव राजेश शेको वाघ, दादाराव जगदेव वानखेडे, प्रचार व पर्यटन सचिव कैलास नारायण बाविसाने, संरक्षण सचिव गंगाधर हिरामण तायडे, विशाल बाबुराव वाघ , संघटक नागसेन धुरंदर, प्रभाकर इंगळे, समाधान नामदेव इंगळे यांची नियुक्ती जाहीर केली या नवनियुक्त कार्यकारणीचे वंचित बहुजन आघाडी जिल्हा महासचिव अतिशभाई खराटे यांनी अभिनंदन केले, या सभेला तालुका अध्यक्ष सुशील मोरे, अजय सावळे, गणेश सावळे, भिमराव नितोने व के.यु.बावस्कर सर, बी.ए.सावळे सर, कडू धुरंधर, विश्वनाथ गाडेकर मेजर समता सैनिक दल, एन.डी.इंगळे सर तथा तालुक्यातील केंद्रिय शिक्षक, बौध्दाचार्य ,उपासक यांच्या उपस्थिती सह भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## वाचकांच्या लेखणीतून

# हुंडा -प्रथा

हुंड्यासाठी आजही अनेक
स्त्रियांना मरावं लागतय!
समाजाच्या जाचक अटींना
बळी पडावं लागतय!
अजून किती वर्ष हुंड्याचे विष
पसरविले जाणार आहे?
आता ,हुंडा विष मारण्याचा
फवारा, फवारला जाणार आहे..
खऱ्या जीवनातील नाईके ची
भूमिका आता नकोशी वाटते !
संयमी मनाच्या चाकूला आता
तीक्ष्ण धार लावूशी वाटते !
स्त्रियांनी आता थोडे कठोर
भूमिकेत यायला पाहिजे!
अन्याय, अत्याचाराला जमिनीवर
लोळवायला पाहिजे!

सासूला काही सुना आई किंवा
मम्मीचा दर्जा देऊ इच्छितात !
आई किंवा मम्मीची भूमिका सासू
संशयाच्या वर्गात बसवितात !
सासू-सासरा, दीर नणंद ही नाती
आता बदनाम होऊ लागली आहेत..
गाय- वासरू ,जनावरे ही मात्र आता
विचार करू लागली आहेत.
हुंडा प्रथा आणली कुणी?
त्याला आता गाडून टाका ..
हुंडा घेणाऱ्या विचाराला आणि
प्रथेला आता जाळून टाका.
श्रीमंतीचा पिसारा कधी पिसे
नसल्यासारखा वाटतोय!
नवरी मुलींच्या शालू तील दोरा
आता उसवल्यासारखा वाटतोय !

शासनाने आता अशी कठोर
शिक्षा आरोपीस सूनवावी..
की, हुंडा देताना आणि घेताना सुद्धा
फाशीच आठवावी..
आता कुळ जोपासणारा साथीदार
नको, तर वेळ पाळणारा हवा !
छळ करणारा जोडीदार नको,
तर बळ देणारा हवा!

काव्यलेखन-
**बी. एन .सोनवणे सर.**
**मु. पो.निघोज-तालुका पारनेर**
**जिल्हा अहिल्यानगर**



# भाजपा किसान मोर्चा ची शेतकऱ्यांसाठी आक्रमक भूमिका

## शेतकरी मित्र बिंदू शेठ शर्मा यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयात दोन तास बैठक

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------



दिनांक २६ मे २०२५ रोजी बागलाण तालुक्यातील तहसील कार्यालय येथे शेतकरी मित्र भाजपा किसान मोर्चा महामंत्री श्री बिंदू शेठ शर्मा यांच्या नेतृत्वाखाली बागलाण तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी तहसील कार्यालय येथे बागलाण तालुक्यातील विविध मागण्यांसाठी अकरा मागण्यांचे निवेदन दिले. तसेच बिंदूशेठ शर्मा यांनी बागलाण तहसीलदार साहेब यांना बागलाण तालुक्यातील विविध समस्यांचा आढावाचला व सविस्तर आढावा बैठक घेतली ही बैठक तब्बल दोन तास चालली या बैठकीत तहसीलदारांना पुढील अकरा कामांचे निवेदन देण्यात आले.

१) पंतप्रधान सन्मान निधी पैसे बँका कर्ज खात्यात वर्ग करून घेतात बेकायदेशीर आहे

२) विमा अवकाळी दुष्काळी गारपीट चे पैसे बँका कर्ज खात्यात वर्ग करतात वर्ग करू नये तात्काळ शेतकऱ्यांना देण्यात यावे

३) नुकसान झालेल्या पिकाचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई हेक्टरी एक लाख रुपये शेतकऱ्यांना देण्यात यावी

४) सटाणा शहरातील अतिक्रमण काढून तात्काळ काम चालू करावे तसेच

५) अवकाळी पाऊस प्रचंड प्रमाणात वारा चक्रीवादळ नैसर्गिक संकटामुळे तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर विद्युत पोल पडणे तारा तुटणे ट्रांसफार्मर जळणे ट्रांसफार्मर वीज पडणे या कारणास्तव वीस पुरवठा सतत खंडित होत आहे तात्काळ वीज पुरवठा सुरळीत करावा

६) बँकांनी ज्या शेतकरी बांधवांनी एक रकमी योजनेत कर्ज परतफेड केली आहे त्यांनी तात्काळ पीक कर्ज द्यावे सिबिल स्कोर चेक करू नये असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेबांचे आदेश आहेत तात्काळ पीक कर्ज वितरित करणे तसेच ७)-रस्ते अतिक्रमण केलेले रस्ते शेतकरी बांधवांना साठी मोकळे करून सातबारा नोंद लावून देणे

८) घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू परवाने देणे २६ मार्च २०२० च्या शासन परिपत्रकातील अनुक्रमांक चार तरतुदीनुसार वाळू उपलब्ध करून देणे ऑफलाइन परवाने देणे.

९) बागलाण तालुक्यातील ज्या नागरिकांचे रेशन कार्ड आहे परंतु त्यांनी मिळत नाही त्यांना धान्य वितरित करणे.

१०) विमा भरलेल्या शेतकरी बांधवांना विम्याचा लाभ मिळवून देणे.

११) सटाणा शहरातील रस्ते तसेच तालुक्यातील रस्ते पाण्या पावसामुळे खराब झालेले तात्काळ रिपेरिंग करावे असे ११ मागण्यांचे जाहीर निवेदन बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आलेली आहे भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश महामंत्री शेतकरी मित्र बिंदू शेठ शर्मा. यावेळी बागलाण तालुक्यातील उपस्थित शेतकरी श्री सुधाकर धर्मा पाटील, दिनेश जाधव, किरण सावकार, रवी पाटोळे, कान वायदे, नवल सोनवणे, गोकुळ पगारे, रविंद्र पगारे, संदीप पाटोळे, समाधान नंदाळे, संग्राम राजे, खुशाल सुरेश मोरे, रवींद्र यादव सोनवणे, वैभव पगारे, भाऊसाहेब मनोहर सोनवणे, राहुल पगारे, कानू अहिरे, दिलीप देवरे ,सुरेश डोमसे, केदा हिरामण अहिरे, निलेश डोळसे, महेश यादव, अशा असंख्य शेतकऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन दिले.

# जैन कलार समाजातर्फे रक्तदान शिबीर व गुणवंत विद्यार्थी भव्य सत्कार

राजेश धुमाळ
नागपुर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------







जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळच्या वतीने दिनांक २४ मे २०२५ ला रक्तदान शिबीर आणि दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थांचा सत्कार जैन कलार समाज भवन, उमरेड रोड, रेशिमबाग नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता व मोठ्या थाटात संपन्न झाला.यामध्ये प्रामुख्याने गुणवंत विद्यार्थी व आदरणीय पालकांच्या विशेष संगम व सहयोगाने तसेच समाजबांधव- भगिनींच्या बहुमोल सहकार्याने या कार्यक्रमाला आगळेवेगळे महत्त्व आले आणि संपूर्ण समाज बांधवांनी आपल्या आप्तांना, संपूर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनींना व रक्तदान करणाऱ्या संपूर्ण समाज बांधवांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या आशिर्वाद देऊन सहकार्य केले हा समाजासाठी व संपूर्ण समाज बांधवांसाठी बहुमोल संदेश आहे.या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले आणि रक्तदान करणाऱ्या समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नागपूर एम्स हॉस्पिटलचे प्रमुख डॉ.मनिष शिरगिरवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यानी संपूर्ण विद्यार्थी-विद्यार्थांना पुढील शिक्षणाच्या व आरोग्याच्या दृष्टिकोनातून संबोधित केले.या कार्यक्रमाला प्रामुख्याने समाजाचे केंद्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आदमने, उपाध्यक्ष शशिकांत समर्थ, श्रीकांत शिवनकर, सुलेखा अहिरकर, स्वप्निल समर्थ, माजी अध्यक्ष अनिल अहिरकर, पत्रकार रमेश लांजेवार, सचिव कार्तिक शेंडे, उपाध्यक्ष विलास हरडे, कोषाध्यक्ष रविकांत हरडे, सहसचिव विनोद खानोरकर, डॉ विजय आदमने, शैलेंद्र दहिकर, डॉ.छाया दुरूगकर, माधुरी घोसेकर, रोशनी समर्थ, संजय शिरपूरकर, संजय खानोरकर, मोरेश्वर मानापुरे, चंद्रशेखर तिडके, राजेंद्र वारजुरकर इत्यादीसह विदर्भातील संपूर्ण जिल्हा समितीच्या पदाधिकारी, समाजबांधव व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरित क्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते लोकार्पण

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------



२६ मे रोजी हरित क्रांतीचे जनक तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा व परिसर सुशोभिकरण कामाचा लोकार्पण सोहळा आज केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते. नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक येथे पार पडलेल्या या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार अशोक चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुसिंग महाराज राठोड, आमदार बाबुराव कदम, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित होते. प्रारंभी मंचावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर श्री. शाह यांनी कळ दाबुन पुतळ्याचे अनावरण केले. तसेच त्यांच्या हस्ते नामफलकाचेही अनावरण करण्यात आले. याप्रसंगी बंजारा समाजाच्यावतीने श्री. शाह व श्री. फडणवीस यांचा पारंपारिक पद्धतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाजाचे नागरिक उपस्थित होते.




हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक परिसरात उभारला आहे. नऊ फूट उंचीच्या या पुतळ्याचे वजन सुमारे ७०० किलो आहे. पुतळ्याच्या उभारणीसाठी रुपये १३ लक्ष ९९ हजार एवढा खर्च आला आहे. २३२.६० चौ.मी. जागेत या पुतळ्याची उभारणी करण्यात आलेली आहे. सुशोभिकरणाचे अंदाजे ६९ लाख रुपयांची कामे आहेत.

# सौ. कविता कुवर यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड

प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------






दि.२६/५/२०२५ रोजी ग्रुप ग्रामपंचायत वासखेडी येथे सरपंच सौ स्वाती सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन उपसरपंच सौ.कविता कुवर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ग्रुप ग्रामपंचायत वासखेडे येथे आज ग्रामपंचायत अधिकारी महिरे व सरपंच सौ स्वाती सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात येथील सन्माननीय सर्व सदस्य व ग्रामस्थ बंधू-भगिनी यांच्या उपस्थितीत सौ कविता कुवर यांची उपसरपंच पदासाठी शिफारस करण्यात आली व सर्वांच्या मताने सौ कविता कुवर यांची उपसरपंच म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. मागील उपसरपंच श्री दीपक जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा सरपंच सौ स्वाती सोनवणे यांच्याकडे सुपूर्द केला व तो राजीनामा तात्काळ मंजूर करण्यात येऊन पुढील बोलीभाषेनुसार ठरवलेले उपसरपंच म्हणून सौ कविता कुवर यांची सर्वानुमते उपसरपंच म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली असे ग्रामपंचायत अधिकारी महिले यांनी घोषित केले. यावेळी महेंद्र मच्छिंद्र कुवर, मधुकर जाधव, दिनेश कुवर, दीपक कुमार, दिगंबर कुवर, निंबा कुवर आधी ग्रामपंचायत सदस्य पंढरीनाथ धनगर, व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. सौ कविता कुवर या उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल सर्व ग्रामस्थ व कुवर परिवाराकडून विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले. याचे सर्व श्रेय व उपसरपंच पद मिळावं म्हणून केलेली तळमळ श्री उपसरपंच प्रतिनिधी पंकज कुवर यांचे ग्रामस्थ व माजी उपसरपंच दीपक भाऊ जाधव, चंद्रकांत मुजगे यांच्याकडून विशेष आभार मानून अभिनंदन करण्यात आले. आपल्या हातून पुढील विकासात्मक कार्य घडो ही सदिच्छा सर्व ग्रामस्थांतर्फे देऊन नवनिर्वाचित उपसरपंच पदावर विराजमान झालेल्या सौ कविता कुवर यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# बारीपाडा येथील पर्यावरण अभ्यास केंद्रात अभाविपचे "चला निसर्गाच्या सानिध्यात" उन्हाळी शिबीर संपन्न

## पद्मश्री श्री चैत्राम पवार यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





पर्यावरण अभ्यास केंद्र बारीपाडा ता. साक्री येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व विकासार्थ विद्यार्थी धुळे विभाग आयोजित दिनांक २०, २१ व २२ मे या दरम्यान चला निसर्गाच्या सानिध्यात उन्हाळी सुट्टी शिबीर उत्साहात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन पद्मश्री श्री चैत्राम पवार, अभाविप देवगिरी प्रदेश सहमंत्री वरुणराज नन्नवरे, अभाविप धुळे जिल्हा प्रमुख प्रा. डॉ. हेमंत जोशी, शिबिर प्रमूख चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी पद्मश्री श्री चैत्राम पवार यांनी म्हणाले की, विकास म्हणजे नक्की काय तर शुद्ध व सात्विक आहार मिळणे म्हणजे विकास आहे. आज विद्यार्थी व्यसनाधिनतेकडे जात आहे. हे रोखण्यासाठी अभाविप अशा शिबिराचे आयोजन नेहमी करत असते. वरुणराज नन्नवरे यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेवी मांडणी करत असताना गेली ७६ वर्षापासून अभाविप शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असल्याचे सांगितले. या शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी जंगलभ्रमंती, वादविवाद स्पर्धा, भाषण सत्र, चर्चा सत्र, ग्रामीण खेळ, जनजाती जीवन अनुभव असे विविध सत्रात सहभागी होऊन नैसर्गिक वातावरण व स्वतःच्या ज्ञानामध्ये भर घालण्याचे काम केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व आजचा शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी या विषयावर प्रा डॉ. हेमंत जोशी यांनी विद्यार्थ्यांना चर्चा केली. ऑपरेशन सिंदूर या विषयावर प्रा. बाजीराव पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर सोशल मीडिया योग्य की अयोग्य या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली. ग्रामीण खेळ व जनजाती जीवन अनुभव या बारीपाडा गावामध्ये विद्यार्थ्यांनी अनुभवला. या शिबिराचे समारोप अभाविप नंदूरबार जिल्हा विद्यार्थी विस्तारक व धुळे जिल्हा संपर्क मंगेश ढगे यांनी केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी चंद्रकांत पाटील, चेतन पाटील, हर्षल सरक, दीपक सरक, रमेश सरक, हर्षल शिरसाठ यांनी मेहनत घेतले.

# सिन्नर बस स्थानकात फलाटावर उभ्या असलेल्या शिवशाही बसवर कोसळला स्लब

## सुदैवाने कोणतीही जीवैथानी नाही; प्रवाश्यांमध्ये घबराटीचे वातावरण

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



धो-धो कोसळणाऱ्या पावसात सिन्नर बसस्थानकातील फलाटावरील स्लॅबचा आवाज झाला आणि काही समजण्याच्या आतच स्लॅबचा काही भाग शिवशाही बसवर कोसळला. बसच्या समोरील भाग आणि दरवाजाजवळच स्लॅब कोसळल्यामुळे बसमधील प्रवाशांना आपत्कालीन खिडकीतून बाहेर काढण्यात आले. या घटनेत स्थानकावरील एका कारचेही नुकसान झाले. रविवारी (दि. २५) दुपारच्या सुमारास ही घटना घडली. यात सुदैवाने कुणालाही इजा झाली नाही. सिन्नर येथील बसस्थानक हे अत्याधुनिक आणि सर्व सुविधांनी युक्त असे स्थानक मानले जाते. जिल्ह्यातील एक उत्तम बसस्थानक म्हणून या स्थानकाचा उल्लेख केला जातो. परंतु, रविवारी झालेल्या मुसळधार पावसाने या बसस्थानकाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. शिर्डी-ठाणे ही शिवशाही बस क्र. (एमएच ०९, ईएम ३५७५) बसस्थानकात उभी होती तर चालक-वाहक बसची नोंद करण्यासाठी नियंत्रण कक्षात गेले होते. बसमध्ये काही प्रवासी होते तर स्थानकावर २५० ते ३०० प्रवासी होते. जोरदार पावसामुळे अचानक बसस्थानक प्लॅटफॉर्मवरील स्लॅब शिवशाही बसवर कोसळला. यावेळी प्रवाशांची धावपळ झाली. प्रवासी स्थानकाबाहेर पळाले तर बसमधील प्रवाशांना आपत्कालीन खिडकीतून बाहेर काढण्यात आले. स्थानकात कुणीही थांबू नये, अशी उद्घोषणा करत स्थानिक निर्मनुष्य करण्यात आले. त्यामुळे स्थानक आवारात भर पावसात प्रवाशांची मोठी गर्दी दरम्यान, घटनेनंतर आगार व्यवस्थापनाने सिन्नर नगर परिषद व पोलिसांना माहिती दिल्यानंतर नगर परिषदेचे अग्निशामक विभागाचे कर्मचारी तसेच पोलिस कर्मचाऱ्यांनी बसस्थानकात धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. जेसीबीच्या सहाय्याने स्लॅबचा कोसळलेला भाग बाजूला करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. परिवहन महामंडळाचे विभागीय वाहतूक अधिकारी भोसले, कल्याणी ढगे, विभाग नियंत्रक सोनवणे, आगार प्रमुख हेमंत नेरकर, स्थानक प्रमुख सुरेश पवार, वाहतूक निरीक्षक भरत शेळके, आण्णा पवार, कर्मचारी देवा सांगळे तसेच सिन्नर नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्यासह अग्निशामक विभागाचे लाला वाल्मिकी, नवनाथ जोंधळे, प्रकाश घेगडमल, अल्ताफ शेख, ताहीर शेख, आकाश देवकर, सागर डावरे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी मदतकार्यात सहभाग घेतला. शिर्डी-ठाणे या बसमधील प्रवाशांची आगार व्यवस्थापक हेमंत नेरकर यांनी तातडीने दुसऱ्या बसमध्ये व्यवस्था करून त्यांना मार्गस्थ केले

**शिवशाही बसमधील सर्व प्रवासी आपत्कालीन खिडकीमधून बाहेर काढण्यात आले तसेच बस स्थानकात असलेले सुमारे २०० ते २५० प्रवासी सुरक्षित ठिकाणी पाठविले आणि तत्काळ बस स्थानक खाली करण्यात आले. शिवशाही बसवर कोसळलेला स्लब जे सी बी च्या सहाय्याने उशिरा पर्यंत काढण्याचे काम सुरु होते**

# खासदार गोवाल पाडवींकडून पिंपळनेरमध्ये आढावा बैठक

## पाणीटंचाई आणि अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीवर भर

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



नंदुरबार लोकसभा मतदारसंघाचे खासदार गोवाल पाडवी यांनी गुरुवारी (आज) पिंपळनेर येथील विश्रामगृहावर एका महत्त्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी, काँग्रेसचे पदाधिकारी आणि स्थानिक पत्रकार उपस्थित होते. पाणीटंचाई, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आणि इतर महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रामुख्याने सामाडे ग्रामपंचायत हद्दीतील तीव्र पाणीटंचाईच्या समस्येवर चर्चा झाली. नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना खासदार पाडवी यांनी प्रशासनाला दिल्या.

**अतिवृष्टीग्रस्तांना तातडीने मदत**

यावेळी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या गावांची पाहणी करण्याबाबतही चर्चा झाली. खासदार पाडवी यांनी स्वतः पिंपळनेर परिसरातील झंझाळे गावाला भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. तसेच, चार बैलांचा वीज पडून दुर्दैवी मृत्यू झालेल्या कुटुंबांची भेट घेऊन त्यांनी सांत्वन केले. नुकसान झालेल्या भागाची लवकरात लवकर पाहणी करून बाधित कुटुंबांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. बैठकीत खासदार पाडवी यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना जनसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्परतेने काम करण्याच्या सूचना दिल्या. पाणीटंचाई, नैसर्गिक आपत्ती आणि इतर नागरी समस्यांवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्याचे आवाहन त्यांनी केले एड.गोवाल पाडवी खासदार, माजी खासदार बापुसाहेब चौरे, तालुका अध्यक्ष भानुदास गांगुर्डे,पं समिती सदस्य संगीता गावीत , प्रविण चौरे, गणेश गावीत,पी एस दादा, सभापती शांताराम कुवर, संदिप भोये, शिवाजी भोये, अविनाश पाटील सचिन सोनवणे, दिपक साळुंखे, सचिन सुर्यवंशी, उत्तम देशमुख, शिवसेना उबाडा चे टिनु वाघ, नाना पगारे, तुषार गवळी, मनोज खैरनार, अल्पसंख्याक चे अफसर सय्यद सह उपस्थित होते या बैठकीमुळे स्थानिक समस्यांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले असून, त्यावर लवकरच तोडगा निघेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महसुल विभागाला सुचना दिल्या साक्री चे तहसीलदार साहेबराव सोनवणे पिंपळनेर चे तहसीलदार दत्तात्रेय शेजुळ व कर्मचारी उपस्थित होते

# खानापूर (फाटा) येथे भव्य संत संमेलनाचे आयोजन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

खानापूरफाटा ता. देगलूर येथे असलेल्या विष्णुगुरू भारत माता मंदिर सहस्त्रकोटी नामस्मरण या पवित्र स्थळी दिनांक २७ मे रोजी मंगळवारी सायंकाळी ४ ते ८ वाजेपर्यंत एक भव्य संत संमेलन पार पडणार आहे. या संमेलनात अयोध्येचे पूज्य महंत गोविंद गिरीजी महाराज, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्यासह विविध भागांतील नामवंत संत, कीर्तनकार आणि धर्मप्रेमी उपस्थित राहणार असून, सत्य सनातन वैदिक हिंदू धर्माच्या मूलभूत तत्त्वांचा विचारमंथनातून प्रसार केला जाणार असल्यामुळे सनातनींनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक संतसेवक तुळशीराम केरले गुरुजी यांनी केले आहे. बऱ्याच कालावधी नंतर नांदेड जिल्ह्यात संत संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाला श्री क्षेत्र अयोध्येचे पूज्य महंत गोविंद गिरीजी महाराज यांचे विशेष आशीर्वचन लाभणार आहे. त्यांच्यासोबत श्री १०८ सिद्धदुर्गाचार्य महाराज (बेळगावकर) यांचाही विशेष सहभाग आहे. संमेलनात ज्येष्ठ कीर्तनकार व वक्ते म्हणूनह. भ. प. कल्याण म. पाटीलकर, डॉ. रावसाहेब साजणे, चंद्रकांत म. लाठेकर,मनोहर म. सखाराम,पंढरीनाथ म. पक्कमवार, योगेश म. वसंत, प्राचार्य सु. ग. चव्हाण, धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर (नांदेड) यांच्यासह इतर अनेक किर्तनकार आणि धर्मप्रेमी उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्प्रवृत्त चंद्रशेखर महाराज देगलूरकर असतील. कार्यक्रमाचे संयोजन संतसेवक तुळशीराम केरले गुरुजी यांच्याकडे असून, संकलन व सूत्रसंचालनाची जबाबदारी मा. श्री. गोविंद नांदेडे यांनी स्वीकारली आहे. सद्गुरू तुकोबाराय म्हणतात, "तुका म्हणे जिणे | भले संतसंगतीने", म्हणजेच संतसंग हेच जीवनाचे सार आहे. आजच्या सामाजिक, धार्मिक आणि आध्यात्मिक दिशाहीनतेच्या काळात संतांचे विचार नवसंजीवनी ठरू शकतात. या संत संमेलनाचा उद्देश केवळ धार्मिक कार्यक्रम न ठेवता, समाजात अध्यात्मिक जागृती, चारित्र्य घडवणूक आणि हिंदू धर्मातील सनातन मूल्यांचे स्मरण करून देणे हाच आहे. भारताच्या अध्यात्मिक इतिहासात संत परंपरेचे फार मोठे योगदान आहे. महाराष्ट्रात ज्ञानेश्वर माऊलीपासून, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा, संत जनाबाई इत्यादी संतांनी समाज प्रबोधन, धर्मजागृती व समानतेचा संदेश दिला. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अन्याय यांचा विरोध करत 'नामस्मरण', 'भक्ती' आणि 'सेवा' या मार्गांनी जनजागृती केली. या परंपरेतूनच आजही असे संमेलन आपल्याला आपली मुळे समजून देतात. ज्ञान, भक्ती, वैराग्य आणि समाजसेवेचा संगम म्हणजेच संतांची शिकवण होय. अशा कार्यक्रमांतून नव्या पिढीला खऱ्या अध्यात्माचे आणि राष्ट्रीयतेचे भान मिळते.त्यामुळे सर्व श्रद्धावान, धर्मप्रेमी, तरुणवर्ग, महिलावर्ग व ग्रामस्थांनी विष्णुगुरू भारत माता मंदिर, सहस्त्रकोटी नामस्मरण, खानापूर (फाटा), ता. देगलूर, जि. नांदेड येथे होणाऱ्या या संमेलनाला उपस्थित राहून संत विचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मनसेत संघटनात्मक फेररचनेचे संकेत, गटबाजी संपविण्यासाठी राज ठाकरेंची पदाधिकाऱ्यांशी चर्चा

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत




स्थापनेपासून पक्षात सक्रिय असणाऱ्या आणि मध्यंतरी थांबून घेतलेल्या पदाधिकाऱ्यांची यादी तयार करा. कुणी नाराज असेल तर त्यांची नाराजी दूर करा, सर्वांना बरोबर घ्या, गटाध्यक्षांच्या नेमणुकीतील त्रुटी शोधा, या संदर्भातील संपूर्ण माहिती संकलित करून ती पुढील चार-पाच दिवसांत सादर करावी, असे निर्देश देत मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्ष संघटनेत फेररचना करण्याचे संकेत दिले.

सोमवारी मनसेचे प्रमुख राज ठाकरे हे नाशिक दौऱ्यावर दोन दिवसांसाठी आले होते. परंतु, केवळ दोन तासात त्यांनी दौरा आवरुन नाशिक सोडले. यापूर्वी त्यांचा दौरा ऐनवेळी रद्द झाला होता. नाशिक दौऱ्यावर मुंबईतील मुसळधार पावसाचे सावट होते. परंतु, राज यांनी नाशिकला येऊन तासभर निवडक प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. यामध्ये डॉ. प्रदीप पवार, प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, अतुल चांडक, सलीम शेख, रतनकुमार इचम, अंकुश पवार, महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा सुजाता डेरे यांचा समावेश होता.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मनसेने संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याकडे लक्ष केंद्रीत केले आहे. मनसे मजबूत करण्यात गटबाजी अडसर ठरते. याआधी वेगवेगळ्या गटाकडून परस्परविरोधी तक्रारी झाल्या होत्या. मनसेच्या जानेवारी महिन्यातील मेळाव्यानंतर शहर आणि जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर केली जाणार असल्याचे सांगितले गेले होते. या दौऱ्यात राज यांचा मुख्य भर पक्षातील गटबाजी संपवून पक्ष संघटना मजबूत करण्यावर राहिल्याचे दिसून आले. कधीकाळी सक्रिय असणारे, काम थांबविणारे आणि परत येण्यास इच्छुक असणाऱ्यांबद्दल विचार करा, संबंधितांच्या घरी जाऊन त्यांच्याशी चर्चा करा, जे पक्षात पुन्हा येण्यास इच्छुक आहेत, त्यांना सामावून घ्या. गटातटाच्या राजकारणात मन दुखावलेल्यांची नाराजी दूर करा. या संबंधीची माहिती याद्यांसह ३० मे रोजी सादर करावी. सर्वांना बरोबर घेऊन काम करावे, असे राज यांनी सूचित केले. पक्ष संघटनेत फेररचना करण्यासाठी आवश्यक ती माहिती त्यांनी मागविल्याचे उपस्थित पदाधिकारी सांगतात. स्थानिक पातळीवर गटाध्यक्षांची नेमणूक केली गेली असून काही पदे रिक्त आहेत. या नेमणुकीतील त्रुटी शोधून रिक्त पदांवर कार्यकर्त्यांची नियुक्तीची सूचना त्यांनी केली. ही माहिती सादर झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले. पाच जून रोजी मनसेचे राजगड हे नूतनीकरण केलेले कार्यालय कार्यान्वित होत आहे. यानिमित्त पूजाविधीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास वा दुसऱ्या दिवशी नाशिकला येण्याचे आश्वासन त्यांनी दिले



झंझाळे येथील शेतकऱ्यांच्या बैलाच्या अंगावर विज पडली होती तिथे खासदार गोवाल पाडवी यांची शेतकऱ्याच्या घरी जाऊन सदिच्छा भेट सोबत प्रवीण चौरे व काँग्रेसचे पदाधिकारी